**-: प्रेसनोट दिनांक- २२/०६/२०२१ :-**

**प्रमोद नेताजीराव साळुंके दुयम निबंधक शिरोळ ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाचेची रक्कम स्विकारले बाबत.........**

---

यातील तक्रारदार ॲड.अमर आण्णासो बुबनाळे हे व्यवसायाने वकिल असुन त्यांनी दिनांक ९.६.२०२१ रोजी दुयम निबंधक कार्यालय शिरोळ येथे त्यांचे पक्षकाराचे बक्षीसपत्र केले असुन त्याची नोंदणी दुयम निबंधक कार्यालयात झालेली आहे. तक्रारदार ॲड.अमर आण्णासो बुबनाळे यांनी नोंदणी झालेले बक्षीसपत्राचा दस्त दुयम निबंधक साळुंके यांचेकडे मागणी केला असता दुयम निबंधक साळुंके यांनी बक्षीसपत्राचा नोंदणी झालेला दस्त तक्रारदार बुबनाळे यांना देणेसाठी त्यांचेकडे २,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार ॲड.बुबनाळे यांनी दुयम निबंधक साळुंके यांचे लाचेच्या मागणीबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूरकडे तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दि. २२/०६/२०२१ रोजी दुयम निबंधक कार्यालय शिरोळ येथे दुयम निबंधक साळुंके यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये दुयम निबंधक साळुंके यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे पक्षकाराचा नोंदणी झालेल्या बक्षीसपत्राचा दस्त देणेसाठी २००० रुपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले. त्यानुसार लागलीच दि. २२/०६/२०२१ रोजी शिरोळ येथील दुयम निबंधक कार्यालयात दुयम निबंधक साळुंके यांचेवर सापळा सापळा कारवाई आयोजित केली असता, दुयम निबंधक साळुंके यांनी २,०००/- रूपये लाच रक्कम तक्रारदार ॲड.बुबनाळे यांचेकडुन स्विकारल्याने त्यांना पकडणेत आले आहे. संदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून प्रमोद नेताजीराव साळुंखे वय ५५ दुयम निबंधक शिरोळ ता.शिरोळ जि.कोल्हापूर यांचे विरुध्द शिरोळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.सुहास नाडगौडा , अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. युवराज सरनोबत, पोहेकॉ शरद पोरे ,पोलीस नाईक विकास माने, नवनाथ कदम, सुनिल घोसाळकर चालक पोहेकॉ सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४,**
**०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

Scanned by TapScanner